RNI No. MAHBIL/2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक २९] सोमवार, ऑक्टोबर १९, २०२०/आश्विन २७, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांजकडून**

**वाचले.**—(१) मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ व ११६.

(२) शासन, गृह विभागाकडील अधिसूचना क्र. एमव्हीए ०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दिनांक १९ मे १९९०.

(३) कार्यकारी अभियंता (रा. म.), म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्र. रा.म. २०१८/०२/उ.अ-७/सी. आर. नं./अभियांत्रिकी/७०६६, दिनांक १६ नोव्हेंबर २०१९.

(४) या कार्यालयाकडील अधिसूचना प्रसिद्ध क्र. गृह/एमएजी-१/वाह. बंदी कळंब-मार्केवाडी पुल/२०१९, दिनांक २ जानेवारी २०२०.

(५) कार्यकारी अभियंता (रा.म.), म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र क्र. रा.म. २०२०/०२/उ.अ./सी.आर नं./अभियांत्रिकी/५४३, दिनांक २१ जानेवारी २०२०.

(६) या कार्यालयाकडील अधिसूचना प्रसिद्ध क्र. गृह/एमएजी-१/वाह. बंदी कळंब-मार्केवाडी पुल/२०२०, दिनांक १३ मार्च २०२०.

(७) कार्यकारी अभियंता, (रा.म.), म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई यांचेकडील पत्र No. NII-2020/02/DE/C.R. No. P-6/ENGG/Bridge Closing, Date २७ एप्रिल २०२०.

(८) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दिनांक १४ मे २०२०.

**वाहतूक बंदी अधिसूचना**

क्रमांक गृह/एमएजी-१/वाह.बंदी कळंब-मार्केवाडी पुल/२०२०.—ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता (रा.म.), म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई यांनी उपोद्घातातील अ. क्र. ३ कडील पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने १ महाकरीता व अ. क्र. ५ कडील पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने २ महाकरीता या कार्यालयाकडील उपोद्घातातील अनुक्रमे अ. क्र. ४ व ६ कडील रोजीच्या अधिसूचन्वये सदर अधिसूचनेच्या दिनांकापासून राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८अ च्या कर्जत तालुक्यातील कळंब-मार्केवाडी (कि.मी. ४३-७८३ ते ६९.५०७ या लांबीतील) कि.मी. ४५.७०९ वरील छोटा पुल वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता (रा.म.), म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई यांचेकडील उपोद्घातातील अ. क्र. ७ अन्वये As per your office order dated 13th March 2020 regarding closing of Minor Bridge at Km. 45.709 for Traffic ; MSRDC has issued instructions to EPC Contractor to start construction of Minor Bridge at Km. 45.709 immediately. Accordingly contractor planned for starting work of Minor Bridge. But this Bridge is important connectivity for vehicles coming from Gujrat, Nashik and going towards JNPT, Pune and during Goa. Considering Epidemic Situation of COVID-19 for keeping the traffic movement smooth during lock down period Contractor have not started the construction of Minor Bridge. Also due to Epidemic Situation of COVID-19 there is shortage of Cement Steel and Skilled Labour. Now contractor have planned for the same and started the work of MNB from 18th April 2020. To complete the work of Minor Bridge in all respect it will need additional minimum two months time. Hence it is requested to grant the extension up to 30th July 2020 for closing of above subjected Minor bridge " असे या कार्यालयास कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता (रा.म.), म.रा.वि. महामंडळ, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार कोव्हिड-१९ या विषाणुचा वाढता प्रादुर्भाव पाहता शासनाने दिनांक १७ मे २०२० पर्यंत संचारबंदी व लॉकडाऊन घोषित केलेले आहे. लॉकडाऊन कालावधीमध्ये सदर पुल बांधकामासाठी आवश्यक असणारी साधन सामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध झाले नसल्याने सदर पुलाच्या बांधणीचे काम करता आले नाही. तसेच पुलावरून होणाऱ्या जाणाऱ्या अतिअवजड वाहतुकीमुळे पुल क्षतीग्रस्त झाल्यास होणारी कोणतीही दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने व (राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८अ च्या कर्जत तालुक्यातील कळंब-मार्केवाडी (कि.मी. ४३-७८३ ते ६९.५०७ या लांबीतील) कि.मी. ४५.७०९ वरील छोटा) पुलाचे बांधणीचे काम सुरू करावयाचे असल्याने सदर छोटा पुल दोन महाकरीता वाहतुकीस बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी, रायगड उपोद्घातातील अ. क्र. १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार या अधिसूचनेच्या दिनांकापासून दोन महाकरीता राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८अ च्या कर्जत तालुक्यातील कळंब-मार्केवाडी (कि.मी. ४३-७८३ ते ६९.५०७ या लांबीतील) कि.मी. ४५.७०९ वरील छोटा पुल वाहतुकीस बंद करणेबाबतचे आदेश जारी करीत आहे.

रायगड,<br>दिनांक १४ मे २०२०.

**निधी चौधरी,**<br>जिल्हादंडाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.